| MHKO050035292024 | **म.सं.कौ.हिं.का. अर्ज क्र.५७/२०२४**<br>**मधील निशाणी क्र.४ वरील आदेश**<br>**सौ. रुकसार समिर मुल्ला**<br>**विरुध्द**<br>**श्री. समिर जावेद मुल्ला वगैरे ३** |
|---|---|

अर्जदार यांनी सदरचा अर्ज घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ अन्वये अर्जदार यांना वि.प. यांनी अर्जाच्या अंतिम निकालापावेतो मुलभुत गरजा भागविणेकरिता, वैदकीय तसेच घरखर्चासह व इतर आनुषंगिक व आवश्यक गरजा भागविणेकरिता अंतरिम पोटगी रक्कम रुपये १०,०००/- दरमहा मिळणेकरिता दाखल केला आहे.

२. अर्जदार यांचे सदर अर्जाद्वारे असे कथन आहे की, अर्जदार व वि.प.नं.१ यांचा विवाह दि.२९/०६/२०१८ रोजी ईदगाह हॉल, जयसिंगपूर येथे मुस्लीम धर्मशास्त्राप्रमाणे झाला. लग्नानंतर अर्जदार वि.प.नं.१ यांचेसोबत वि.प. यांचे घरी सासरी नांदण्याकरिता गेल्या. अर्जदार व वि.प.नं.१ यांना दि.०९/०४/२०१९ रोजी पहिले अपत्य मुलगा कु. विहान व दुसरे अपत्य मुलगी जुनेरा दि.१७/०९/२०२१ रोजी झाली. अर्जदार यांनी कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ चे कलम १२ प्रमाणे वि.प. यांचे विरुध्द अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये अर्जदार यांनी त्यांचेवर वि.प. यांनी केलेल्या कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना सविस्तरपणे नमुद केल्या आहेत. सदर मुळ अर्जाच्या गुणदोषावरील निकालासाठी बराच दिनावधी लागणार आहे. वि.प.नं.१ हे इमारतीचे सेंट्रींगचे काम करतात. त्यापासून वि.प.नं.१ यांना दरमहा २०,०००/- इतके उत्पन्न आहे. याउलट अर्जदार यांचेकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. अर्जदार या त्यांचे दैनंदिन गरजाकरिता पुर्णतः त्यांचे आई-वडिल यांवर अवलंबून आहेत. अर्जदार यांना वि.प. चे उच्च राहणीमानाप्रमाणे जगणेचा हक्क आहे. वि.प. यांचेवर दोन लहान मुलीशिवाय अन्य कोणीही अवलंबित नाही. सबब, अर्जदार यांना वि.प. यांनी अर्जाच्या अंतिम निकालापावेतो मुलभुत गरजा भागविणेकरीता, वैद्यकीय तसेच घरखर्चासह व इतर आनुषंगिक व आवश्यक गरजा भागविणेकरीता दरमहा रक्कम रुपये १०,०००/- प्रमाणे रक्कम मिळणेबाबत अंतरिम आदेश करणेत यावे अशी अर्जदार यांनी विनंती केली आहे.

३. वि.प.क्रं.१ ते ३ यांनी निशाणी १० कडे मूळ अर्जास व अंतरिम अर्जास म्हणणे दाखल केले आहे की, अर्जदार व वि.प.क्रं.१ हे पती पत्नी आहेत व त्यांचेतील विवाह बंधन कायदयाने अस्तीत्वात आहे हे मान्य आहे. तसेच अर्जदार हीला वि.प.क्रं.१ यांचेपासून विहान हा मुलगा व जुनैरा ही मुलगी झाली आहे हे मान्य आहे. अर्जातील इतर संपूर्ण मजकूर व त्यातील कथने खोटी, लबाडीची, चुकीची असुन वि.प. यांना मान्य व कबूल नाहीत व ते स्पष्ट शब्दात त्याचा इन्कार करतात. वि. प. यांनी त्यांचे म्हणणे सविस्तरपणे नि.१० कडे दाखल केले आहे. वि.प.नं.१ हे ड्रायव्हींगचे बदली काम करतात व त्यांना दिवसागणिक १५० ते २०० उत्पन्न मिळते. अर्जदार ही स्वतः पहिली ते पाचीवपर्यंतचे मुलांची खाजगी शिकवणी घेत असलेने व ती स्वतः कमवती असलेने तिला वीस ते पंचवीस हजार इतके उत्पन्न मिळते. सबब, अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करणेची विनंती वि.प. यांनी केली आहे.

४. अर्जदारतर्फे विधीज्ञ व वि.प.क्रं.१ ते ३ यांचे तर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. करिता सदरचा अर्ज हा मेरीटवर निकली काढण्यासाठी पुढील मुद्दे माझ्या निदर्शनास उपस्थित झाले असून त्यावरील कारणमीमांसेसहीत निष्कर्ष पुढील प्रमाणे -

| **अ.क्रं.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अर्जदार अर्जातील मागण्या मंजुर होऊन मिळण्यास पात्र आहे का? | अंतीम आदेशाप्रमाणे |
| २ | काय आदेश ? | अंतीम आदेशाप्रमाणे |

**<u>मुद्दा क्रं. १ व २ करिता-</u>**

५. अर्जदार यांनी सदर अर्जाच्या मागणी पृष्ठयर्थ निशाणी ३ कडे अर्जदार व वि.प.नं.१ यांचे लग्नाची मुळ यादी, अर्जदार यांचे आधार कार्डची प्रत इत्यादी दस्तऐवज अभिलेखावर दाखल केले आहेत. तसेच निशाणी ८ कडे अर्जदार यांचे मालमत्ता, उत्पन्न व खर्च याबाबत शपथपत्र दाखल केले आहे.

६. वि.प. क्रं.१ यांनी त्यांचे म्हणण्यापृष्टयार्थ नि.११ कडे त्याचे मालमत्ता, उत्पन्न व दायीत्व याबाबत शपथपत्र दाखल केले आहे. तसेच वि.प यांनी नि.१२ च्या दस्तऐवज यादीसोबत अर्जदार यांच्या तक्रारी अर्जाची झेरॉक्सप्रत, हजेरी असलेबाबत रजिस्टरची

झेरॉक्स प्रत, दाखला, मोबाईलचा स्क्रीन शॉटची छायांकित प्रत, मोबाईलचा स्क्रीन शॉटची छायांकित प्रत, मोबाईलवरील चॅटींगचे स्क्रीन शॉटची छायांकित प्रती इत्यादी कागदपत्रे अभिलेखावर दाखल केली आहेत.

७. अभिलेखावरील दस्तऐवज तसेच अर्जदार व वि.प. यांचे कथनावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, अर्जदार व वि.प.क्र.१ यांचा विवाह झाल्याबाबत व त्यांच्या लग्नसंबंधातून त्यांना कु. विहान हा मुलगा व कु. जुनेरा ही मुलगी ही अपत्ये असल्याचे दोन्ही पक्षांना मान्य आहे. अर्जदार ही ब-याच दिवसापासून वि.प.क्र.१ यांच्यासोबत राहत नाही. अर्जदार ही वि.प.क्रं.१ यांच्यासोबत राहत असताना अर्जदार हिचेवर कौटूंबिक हिंसाचार झाला आहे. तसेच अर्जदार हिला वि.प.क्र.१ यांच्या अर्जदार यांच्यासोबत असलेल्या वर्तनामूळे अर्जदार हिला शारिरीक व मानसिक त्रास झाला असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच वि.प.क्र.१ यांनी अर्जदारासोबत केलेल्या कौटूंबिक हिंसाचारामूळे अर्जदार यांना आज रोजी माहेरी रहावे लागत आहे. वि.प.क्र.१ यांनी अर्जदार हिच्या मुलगभुत गरजा, वैद्यकीय खर्च, आवश्यक गरजा, राहण्याची किंवा पालनपोषणाची कोणतीही व्यवस्था केली असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. आज रोजी वि.प.क्र.१ हे अर्जदार हिचे पती असल्याकारणाने अर्जदार हिचा पालनपोषण व इतर खर्च करण्याची नैतिक जबाबदारी वि.प.क्र.१ यांची आहे. तसेच कायदयाप्रमाणे पतीच्या उत्पन्नाप्रमाणे व पतीच्या राहणीमानाप्रमाणे पत्नीचे देखील राहणीमान राखता येईल इतपत पत्नीला पतीकडून पोटगी मिळणे आवश्यक आहे. त्यामूळे अर्जदार हिला वि.प.क्र.१ यांच्या बरोबरीचे राहणीमान मिळण्याकरीता व पालनपोषणाकरीता कलम २३ मधील तरतूदीप्रमाणे अंतरिम पोटगी मिळणे न्यायोचित होईल. अर्जदार हिचे उत्पन्न रुपये २५,०००/- असल्याचे कथन वि.प. क्रं.१ यांनी केले आहे. परंतू सदर कथना पृष्ठयर्थ वि.प. क्रं.१ यांनी कोणताही कागदोपत्री पूरावा अर्जदार यांच्या उत्पन्नाबाबत अभिलेखावर दिलेला नाही. अर्जदार ही शिक्षीत असली तरी ती आज रोजी कोणतीही नोकरी करीत असल्याबाबत पूरावा अभिलेखावर नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी असे दिसून येते की, अर्जदार ही स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास आज रोजी असमर्थ आहे. तसेच वि.प.क्र.१ हे धडधाकट असल्याचे प्रथमदर्शनी दिसत असून एखादा व्यक्ती मजूरी काम करुन देखील दिवसाला ५००/- रुपये कमवू शकतो याप्रमाणे त्याचे उत्पन्न सरासरी कमीत कमी रुपये १५,०००/- इतके होते. वि.प. क्रं.१ हे इमारतीचे

सेंट्रींगचे काम करतात व त्यापासून त्यांना दरमहा २०,०००/- उत्पन्न आहे असे अर्जदार यांचे कथन आहे. वि.प.क्रं.१ हे शिक्षीत आहेत असे अर्जदाराचे कथन आहे.

८. सदर प्रकरणातील नि.१६ वर वि.प. यांनी खालील प्रमाणे न्यायनिर्णय दाखल केले आहेत.

**A]** ***<u>Sangita Saha Vs. Abhijit Saha & Ors decided on 28/01/2019 in Petition for Special Leave to Appeal (Crl.) Nos.2600-2601 of 2016</u>***

**B]** ***<u>Koushik s/o Anil Gharami Vs. Sau. Sangeeta Koushik Gharami & Ors reported in 2014 ALL MR (Cri.) 2398.</u>***

सदर न्यायनिर्णयांचे अवलोकन केले. उपरोक्त दोन्ही न्यायनिर्णयांमधील वस्तुस्थिती व सदर प्रकरणातील वस्तुस्थिती ही भिन्न असल्यामुळे त्यामधील निर्देष प्रस्तुत प्रकरणास लागू होत नाहीत.

९. सदर प्रकरणात अदयाप पूरावा होणे बाकी आहे व दोन्ही पक्षांना त्यांचा पूरावा देण्याची संधी आहे. करीता उपरोक्त विवेचनांचा विचार करता अर्जदार यांच्या करीता रक्कम रुपये ५,०००/- (रक्कम पाच हजार फक्त) वि.प.क्रं.१ याने दरमहा अंतरिम पोटगी म्हणून अदा करणेबाबत आदेश पारित करणे न्यायोचित ठरेल. म्हणुन मुद्दा क्रं.१ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदवून मुद्दा क्रं. २ बाबत खालील आदेश पारीत करणेत येतो-

**<u>आदेश</u>**

१. अर्ज अंशतः मंजुर करणेत येत आहे.

२. वि.प.क्रं.१ याने मूख्य अर्जाच्या अंतिम निकालापर्यंत अर्जदार यांच्या करीता रक्कम रुपये ५,०००/- (रक्कम रुपये पाच हजार फक्त) दरमहा इतकी अंतरिम पोटगी अर्ज दाखल तारखेपासून ते सदर प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत अदा करावी.

३. सदर आदेशाची प्रत पक्षकारांना विनामुल्य देणेत यावी.

Digitally signed by MRUNMAYEE MUKUNDRAO CHOUDHARY
Date: 2025.03.04 17:55:40 +0530

इचलकरंजी (एम.एम.चौधरी )
दिनांकः०४/०३/२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२, इचलकरंजी